# साहित्य आणि संस्कृती मंडळ

# नागरिकांची सनद

## साहित्य आणि संस्कृती मंडळामार्फत सर्वसामान्य नागरिकांसाठी राबवल्या जाणाऱ्या योजना

**प्रस्तावना -**

- मराठी भाषा, साहित्य संस्कृती व कला या क्षेत्रांमध्ये महाराष्ट्रास लाभलेला थोर वारसा जतन आणि संवर्धन करण्यासाठी आणि मराठी भाषेत विविध विषयावरील मूलभूत संशोधन व प्रकाशन यांना उत्तेजन देण्याच्या हेतूने महाराष्ट्र शासनाने १९ नोव्हेंबर, १९६० मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची स्थापना केली. अशा तऱ्हेच्या मंडळाची मूळ संकल्पना महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतरावजी चव्हाण यांची होती. सर्व देशामध्ये राज्य पातळीवर साहित्य संस्कृती विषयक स्थापन करण्यात आलेले हे पहिलेच मंडळ होय.

- मंडळाचे पहिले अध्यक्ष तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी होते.

- विज्ञान, आधुनिक तंत्रज्ञान , समाजविद्या यांच्या कक्षेत येणारे विषय तसेच महाराष्ट्राची भाषा, संस्कृती आणि इतिहास या विषयावर मराठीमध्ये ग्रंथरचना करण्यासाठी विविध वाङ्मयीन योजनांना चालना देणे, मदत करणे व अशा योजना मंडळाने स्वत: हाती घेणे हे साहित्य आणि संस्कृती मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

- शासनाने मंडळाकडे सोपविलेली वरील उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आणि आधुनिक महाराष्ट्राच्या वाङ्मयीन गरजा लक्षात घेऊन सुरुवातीपासूनच मंडळ मौलिक व बहुविध वाङ्मयीन निर्मितीसाठी कार्यरत आहे.

**मंडळाच्या योजना अ) -- मंडळाची पुस्तक प्रकाशन योजना**

१) **शास्त्रीय (विज्ञान) ग्रंथमाला** - या मालिकेतील पुस्तके, विज्ञान व तंत्रज्ञान या विषयांवरील क्रमिक पुस्तकांना मराठी वाचकांना पूरक व संदर्भग्रंथ म्हणून उपयोगी ठरतात.

२) **उत्कृष्ट ग्रंथांचे भाषांतर** - मराठीशिवाय इंग्रजी, रशियन, फ्रेंच संस्कृत व प्राकृत इत्यादी अन्य भाषांतील विविध विषयांवरील भाषांतून मंडळाने पुस्तके भाषांतरित केली आहेत.

३) **महाराष्ट्राचा इतिहास व महाराष्ट्राच्या इतिहासाशी संबंधित ऐतिहासिक कागद-पत्रांचे संपादन प्रकाशन व संशोधन** - १) महाराष्ट्राचा प्रमाणभूत असा सुलभ राजकीय, सांस्कृतिक इतिहास मराठी भाषेत नव्याने संपादित/प्रकाशित करण्याची ही योजना आहे. प्रागैतिहासिक कालापासून ते आधुनिक कालापर्यंत साधारणत: प्रत्येकी ५०० पृष्ठांच्या ५ खंडात म्हणजे (१) प्राचीन कालखंड, (२) मध्ययुगीन कालखंड, (३) मराठा कालखंड भाग-१, शिवकाल, (४) मराठा कालखंड भाग-२ पेशवेकाल व (५) आधुनिक कालखंड प्रकाशित करण्यात येतील. यापैकी प्राचीन कालखंड भाग-१, मध्ययुगीन कालखंड भाग-१ (खंड १ व २), मराठा कालखंड भाग-१ (शिवकाल) व मराठा कालखंड भाग-२, पेशवेकाल हे खंड प्रकाशित झाले

....२/-

आहेत. आधुनिक कालखंडाच्या (सन १८१९ ते १९४७) आणि (१९४८ ते २०१०) या खंडाच्या संपादनाचे काम सुरु आहे.

**४) वैचारिक, समीक्षात्मक, चरित्रात्मक स्वरुपाची प्रकाशने** - वाचकास कमी किमतीत उपलब्ध करुन देण्याच्या या योजनेत मराठीतील प्रतिभावंत साहित्यिकांच्या साहित्याचे पुनर्मुद्रण, समाज परिवर्तन घडविण्यास मदत होऊ शकेल असे थोर विचारवंतांचे वाङ्मय, असामान्य व्यक्तिंची चरित्रे वगैरे प्रकाशित करण्यात येतात. मंडळाच्या पुस्तक प्रकाशन योजनेंतर्गत आतापावेतो ४९० ग्रंथ प्रकाशित झाले आहेत.

**५) महाराष्ट्राचे शिल्पकार** - महाराष्ट्राच्या राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, आर्थिक व वैचारिक जडणघडणीत ज्यांनी हातभार लावला त्यांच्या जीवनकार्यावर आधारित साधारणतः शंभर ते सव्वाशे पानांची चरित्रे "महाराष्ट्राचे शिल्पकार" या योजनेंतर्गत पुस्तक रुपाने प्रकाशित करण्याची ही योजना आहे. आतापर्यंत एकूण ३३ थोर व्यक्तींची चरित्रे प्रकाशित करण्यात आली आहेत.

**६) ललितेतर वाङ्मयासाठी अनुदान** - या योजनेअंतर्गत मराठीतील वैचारिक व शास्त्रीय विषयावरील तज्ज्ञांनी लिहिलेल्या संशोधनात्मक व वैशिष्टयपूर्ण अशा उच्च दर्जाच्या लेखनाचा विचार अनुदानासाठी केला जातो.

**७) वाङ्मय कोश** - मराठी भाषेचे अभ्यासक, सर्वसामान्य वाचक व मराठी वाङ्मयाचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मराठी वाङ्मय कोश खंड स्वरुपात संपादित करुन प्रकाशित केले जातील. आतापर्यंत ४ खंड प्रकाशित झाले आहेत.

८) **मराठी शब्दकोश**-आधुनिक ज्ञानविज्ञानाच्या संदर्भात शब्दकोशविषयक योजना राबविण्यात येत आहे. या कोशात जवळजवळ दीड लाख शब्द असतील व ते १० खंडात प्रकाशित करण्यात येतील. या शब्दकोशाचे ४ खंड प्रकाशित झाले असून खंड ५ प्रकाशनासाठी सोपविला आहे.

**ब) नवलेखकांना प्रोत्साहन अनुदान योजना - १) नवलेखकांना प्रोत्साहन** - या योजनेत ज्यांचे एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा लेखकांना काव्य, कथा, नाटक/एकांकिका, कादंबरी, ललितगद्य व बालवाङ्मय या लेखनाच्या प्रकाशनासाठी अनुदान दिले जाते. आजपर्यंत नवलेख-कांच्या एकूण २०६१ पुस्तकांपैकी २०५८ पुस्तके प्रकाशित झाली आहेत

**१)यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार** - या योजनेत मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तकां-पैकी उत्कृष्ट पुस्तकांची निवड करुन त्यांना यशवंतराव चव्हाण वाङ्मय पुरस्कार काव्य, कथा, नाटक/एकांकिका, कादंबरी, ललितगद्य, बालवाङ्मय या सहा वाङ्मय प्रकारात दिला जातो. आतापावेतो १४५ नवलेखकांच्या पुस्तकांना यशवंतराव चव्हाण वाङ्.मय पुरस्कार दिले आहेत.

**२)नवलेखकांची चर्चासत्रे/कार्यशाळा** - नवलेखकांना ज्येष्ठ साहित्यिकांचे मार्गदर्शन व्हावे, म्हणून महाराष्ट्रात विविध ठिकाणी नवलेखकांच्या आजपावेतो ६० कार्यशाळा/चर्चासत्रे आयोजित केल्या आहेत.

**३)** नवलेखकांच्या उत्कृष्ट ग्रंथ निर्मितीसाठी **सरफोजीराजे भोसले** पुरस्कार प्रकाशकांना दिला जातो. आतापावेतो ९ प्रकाशकांना सरफोजीराजे भोसले पुरस्कार दिले आहेत.

**क) साहित्य संस्थांना अनुदान**-मराठी साहित्य आणि संस्कृतीच्या विकासासाठी अनुदान योजनेंतर्गत **१)** अखिल भारतीय साहित्य महामंडळ **२)** विदर्भ मराठी साहित्य परिषद, नागपूर **३)** मराठवाडा

(४) वाड्.मय प्रकारानुसार संबंधित तज्ञां-कडून हस्तलिखिताचा दर्जा व गुणवत्ता तपासली जाते.
(५) त्यानंतर अनुकूल अभिप्राय असलेल्या हस्तलिखितांना मुद्रणालयाकडे पाठविले जाते.
(६) प्रतिकूल अभिप्राय असलेल्या लेखकांना नकार कळविला जातो.
(७) संपूर्ण प्रक्रियेसाठी लागणारा कालावधी -- एक ते दीड वर्ष
(८) अर्ज व इतर माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव -सचिव, साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

**२-- प्रकाशक अनुदान कार्यपद्धती --**

(१) या योजनेत मुद्रणासाठी पुस्तके मिळावीत म्हणून प्रकाशकांना मंडळाकडे अर्ज करावा लागतो. नवलेखक अनुदान समिती प्रकाशकांचा दर्जा, अनुभव, विश्वासार्हता बघून दरवर्षी प्रकाशकांची यादी तयार करते जुन्या यादीवर पुर्नविचार केला जातो.
(२) नवलेखकांच्या ज्या हस्तलिखितांना अनुकूल अभिप्राय मिळतो ती हस्तलिखिते मुद्रणासाठी निवड झालेल्या प्रकाशकांकडे पाठविली जातात.
३) त्यांना प्रारंभी मुद्रणाच्या एकूण खर्चाच्या ६५ टक्के रक्कम दिली जाते. मुद्रण पूर्ण झाल्यावर उर्वरित रक्कम दिली जाते.
(४) अर्ज व इतर माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव -- अध्यक्ष व सचिव.

**३-- गौरववृत्ती कार्यपद्धती -- १)** ही गौरववृत्ती दोन ज्येष्ठ व्यक्तींना दिली जाते. **२)** यामध्ये एक ज्येष्ठ साहित्यिक व एक ज्येष्ठ लोककलावंत यांचा समावेश असतो. **३)** या दोघांची निवड मंडळाचे सदस्य बहुमताने करतात. **४)** गौरववृत्तीची रक्कम प्रत्येकी रु..५०,०००/- **५)** माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव -- अध्यक्ष / सचिव

**४ -- वाड्.मयीन नियतकालिकांना अनुदान कार्यपद्धती -- १)** मंडळाकडे अनुदानासाठी स्वत: अर्ज करणाऱ्या कोणत्याही वाड्.मयीन **२)** नियतकालिकांचा या योजनेमधून अनुदान देण्यासाठी विचार केला जातो. **३)** वाड्.मय नियतकालिक अनुदान समितीपुढे मंडळाला प्राप्त झालेले सर्व अर्ज व नियतकालिके विचारार्थ ठेवली जातात. **४)** समितीचे सदस्य वाड्.मयीन नियतकालिकांची गुणवत्ता, दर्जा, नियमितता, उपयुक्तता यांचा साकल्याने विचार करुन **(१)**अनुदानासाठी शिफारस करणे किंवा **(२)** अनुदानासाठी अपात्र ठरवणे **(३)** अनुदान वाढ किंवा घट करणे **(४)** अनुदान थांबविणे अशा पद्धतीने निर्णय घेतात. **५)** प्रतिकूल / अनुकूल अभिप्राय संबंधि-तांना कळविला जातो. **६)** अनुदानासाठी अर्ज प्राप्त झाल्यानंतर अनुदान मान्य होईपर्यंतचा कालावधी--अंदाजे एक वर्ष **७)** अर्ज व इतर माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यांचे नाव--अध्यक्ष/सचिव

**५ -- मंडळातर्फे ग्रंथ प्रकाशन/ग्रंथ प्रकाशनासाठी अनुदान कार्यपद्धती -- (१)** सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, ऐतिहासिक यासारख्या विषयांवर संशोधनात्मक पातळीवरचे लेखन करणाऱ्या व्यक्तिला रु..२०,०००/- चे अनुदान दिले जाते. **(२)** संबंधित व्यक्तींकडून मंडळाकडे प्राप्त झालेल्या संहिता वाड्.मय प्रकल्प समितीच्या बैठकीमध्ये विचारार्थ ठेवल्या जातात **(३)** सदस्यांनी निवड केलेल्या संहिता त्या त्या विषयातील तज्ञांकडे अभिप्रायासाठी पाठवल्या जातात. **(४)** अनुकूल अभिप्राय आल्यास संबंधित लेखक/संशोधकाला रु.२०,०००/- चे अनुदान दिले जाते. किंवा हा ग्रंथ मंडळ स्वत: प्रकाशित करते. लेखकाला मानधन दिले जाते. **(५)** या सर्व प्रक्रियेला दीड ते दोन वर्षांचा कालावधी लागू शकतो. **(६)** अर्ज व इतर माहिती देणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव -- अध्यक्ष / सचिव

साहित्य परिषद, औरंगाबाद **४)** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे **५)** मुंबई मराठी साहित्य संघ, मुंबई **६)** कोकण मराठी साहित्य परिषद, रत्नागिरी **७)** दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभा, कोल्हापूर या **७** संस्थांना दरवर्षी प्रत्येकी रक्कम ५.०० लाख रुपये अनुदान देण्यात येते.

**ड)** **वाड्.मयीन नियतकालिकांना अनुदान योजना--** **१)** या योजनेत बहुविध वाङ्मयीन, समाजोपयोगी, समीक्षात्मक, वैचारिक विचारधारा असलेल्या वाड्.मयीन नियतकालिकांचा अंतर्भाव असतो. अशा नियतकालिकांचा वाड्.मयीन दर्जा, नियमितता, उपयुक्तता यांचा साकल्याने विचार केला जातो. सन २०११-१२ या वर्षात निवड करण्यात आलेल्या ५६ नियतकालिकांना अनुदान देण्यात आले आहे.

**इ)** **गौरववृत्ती योजना --** मंडळातर्फे दरवर्षी एक ज्येष्ठ साहित्यिक व एका ज्येष्ठ कलावंताला गौरववृत्ती दिली जाते. आतापावेतो ५८ ज्येष्ठ साहित्यिक व ज्येष्ठ कलावंतांना गौरववृत्ती प्रदान करण्यात आली आहे.

**ई)** **सुवर्ण महोत्सवी प्रकल्प**-महाराष्ट्र राज्य निर्मितीच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त मंडळाने नवीन योजना हाती घेतल्या आहेत. १) **मराठी नाटक आणि रंगभूमीचा इतिहास** - या प्रकल्पाच्या संपादनाचे काम प्रा.दत्ता भगत यांच्याकडे सोपविण्यात आले आहे. **२) मराठी चित्रपटसृष्टीचा इतिहास** - मराठी चित्रपटांचा समग्र इतिहास ग्रंथरुपाने तयार करण्यात येईल. हा प्रकल्प ज्येष्ठ चित्रपट समिक्षिका आणि अभ्यासक रेखा देशपांडे यांच्याकडे सोपविला आहे. **३)** **सांस्कृतिक महाराष्ट्र** - गेल्या ५० वर्षातील महाराष्ट्राने विविध क्षेत्रात केलेल्या प्रगतीचा सांस्कृतिक अंगाने घेतलेला विस्तृत आणि व्यापक आढावा घेणारा महाग्रंथ (पृष्ठ १०००, खंड १ व खंड २.)

**बोलीभाषा प्रकल्प** - मुंबई विद्यापीठाच्या सहकार्याने मालवणी व आग्री बोलीभाषा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांच्या सहकार्याने मराठवाडी बोलीभाषा, संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती यांच्या सहकार्याने वऱ्हाडी बोलीभाषा आणि उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या सहकार्याने अहिराणी बोलीभाषेचा संशोधनाचा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

**ए)** **नवे प्रस्तावित प्रकल्प--** **१)** ग्रंथ संस्कृतीला चालना देण्यासाठी विविध जिल्हयांमध्ये ग्रंथोत्सव **२)** छोटया साहित्य संमेलनांना आर्थिक साहाय्य. **३)** बृहन्महाराष्ट्रातील मंडळांना अर्थसाहाय्य **४)** व्युत्पत्ती कोश **५)** वचनकोश **६)** नाटयसंज्ञा कोश **७)** अलंकार व वेशभूषा कोश **८)** हस्त-कला कोश **९)** खाद्य संस्कृती कोश **१०)** संतवचनांचे अनुदान **११)** मंडळाच्या दुर्मिळ ग्रंथांचे इ-बूक

## योजनेचा लाभ देण्याची कार्यपद्धती

**१ -- नवलेखक अनुदान कार्यपद्धती** (१) नवलेखक अनुदान योजनेची प्रसिद्धी महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वृत्तपत्रांमधून माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत दर वर्षी १ एप्रिल ते ३१ मे या कालावधीमध्ये प्रसिद्धी दिली जाते.

(२) मंडळाच्या **mahasahityasanskriti.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावरही ही माहिती ठेवली जाते.

(३) या वृत्ताच्या अनुषंगाने निर्धारित कालावधित आलेल्या सर्व हस्तलिखितांना नवलेखक अनुदान समितीपुढे विचारार्थ ठेवण्यात येतात.

# महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ

## नागरिकांची सनद

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाची संरचना

**अध्यक्ष**

१) **सचिव** | सदस्य

२) अधीक्षक-१ पद - रिक्त
३) रीडर-१ पद
४) सहायक लेखा अधिकारी-१ पद
५) प्रकाशन सहायक -१ पद-रिक्त
६) सहायक -१ पद-रिक्त
७) टिप्पणी सहायक -१ पद-रिक्त
८) टिप्पणी सहायक -१ पद-रिक्त
९) उच्चश्रेणी लघुलेखक-१ पद
१०) निम्नश्रेणी लघुलेखक (अध्यक्षांचे स्वीय सहायक) - १ पद (गृहमंत्री कार्यालयात प्रतिनियुक्ती)
११) ग्रंथालयीन सहायक -१ पद
१२) रोखपाल-१ पद
१३) लिपिक/ लिपिक-टंकलेखक- ५ पदे
१४) लिपिक-टंकलेखक- १ पद-रिक्त
१५) वाहनचालक - १ पद
१६) शिपाई-२ पदे

अशी एकूण २१ पदे.